जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १८३ दिनांक - २१/०३/२०२५**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन पुणे शहर

## अपह्रत केलेल्या तीन अल्पवयीन मुलींचा शोध घेवून सुखरुप दिले पालकांच्या ताब्यात

अल्पवयीन मुलींना कोणीतरी अज्ञात इसमांनी फुस लावुन पळुन नेले बाबत भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन येथे तीन गुन्हे दाखल आहेत.पिडीत अपह्रत मुलींचा वरीष्ठ पोलीस निरीक्षक,सावळाराम साळगांवकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन कडील पोलीस अधिकारी व पो.अंमलदार यांनी शोध घेतला असता त्या खालील प्रमाणे मिळुन आलेल्या आहेत.

१. भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ६५/२०२५, भारतीय न्याय संहीता कलम १३७(२) या गुन्हयातील पिडीत अपह्रत मुलीचा अंमलदार मंगेश ढोमसे,केतन लोखंडे,सागर कोंडे,महीला अंमलदार सोनल कामठे यांनी शोध घेतला असता ती आधोली,आंध्रप्रदेश,येथे सुखरुप मिळुन आली असुन तिस तिचे पालकांचे ताब्यात सुखरुप देण्यात आले आहे.

२. भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर १०७/२०२५,भारतीय न्याय संहीता कलम १३७(२) या गुन्हयातील अपह्रत मुलीचा पोलीस उप निरीक्षक निलेश मोकाशी,पोलीस अंमलदार मंगेश पवार, अभिनय चौधरी,बंडु सुतार,सचिन गाडे,महेश बारवकर यांनी शोध घेतला असता ती आळंदी,पुणे,येथे सुखरुप मिळुन आली असुन तीस सुरक्षिततेच्या कारणास्वत महीला सुरक्षागृहात ठेवण्यात आले आहे.

३. भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर १५३/२०२५,भारतीय न्याय संहीता कलम १३७(२) या गुन्हयातील अपह्रत मुलीचा सपोनि कदम,पोलीस अंमलदार प्रदीप चव्हाण यांनी शोध घेतला असता ती घणसवंगी,जालना येथे सुखरुप मिळुन आली असुन तिस तिचे पालकांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुकत,पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २,पुणे शहर,श्रीमती स्मार्तना पाटील मा.पोलीस उप आयुक्त,पुणे शहर,श्री. मिलींद मोहीते, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग,पुणे श्री.राहुल आवारे, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पो.निरीक्षक भारती विदयापीठ पो.स्टे.कडील सावळाराम साळगांवकर, पो.निरीक्षक(गुन्हे)श्री.राहुलकुमार खिलारे, सपोनि समीर कदम, सपोनि समीर शेंडे,पोलीस उपनिरीक्षक निलेश मोकाशी, व भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन कडील पोलीस अंमलदार यांनी केली आहे.